पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांच्या मौजे वाळवा, जि.सांगली येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या दुस-या टप्प्याच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्मारक ३११७/प्र.क्र. २२६/२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : ३० जून, २०१८

वाचा :-

१) जिल्हाधिकारी, सांगली यांची पत्र क्रमांक गृह-१/कार्या-६/पोल-१/स्मारक/एसआर/१४/१८, दिनांक ९.२.२०१८, दिनांक २१.५.२०१८ व दिनांक ३०.६. २०१८

२) नियोजन विभाग, परिपत्रक क्रमांक ससमा २०१०/प्र क्र. ४८ (भाग-१)/ का-१४६१, दि.११.६.२०१८

प्रस्तावना :

जिल्हाधिकारी, सांगली यांनी उपरोक्त पत्रान्वये पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांच्या मौजे वाळवा, जि.सांगली येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या दुस-या टप्प्याच्या रु. १६६५.०० लक्ष किंमतीच्या कामाचे आराखडे व अंदाजपत्रक शासनाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले असून त्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१) पद्मभुषण क्रांतीवीर डॉ.नागनाथ अण्णा नायकवडी यांचे मौजे नागनाथनगर, ता.वाळवा, जि.सांगली येथील स्मारकाच्या दुस-या टप्प्याच्या बांधकामासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी सादर केलेल्या दुस-या टप्प्याच्या रुपये **१६६५.००** लक्ष एवढया रक्कमेच्या प्रस्तावाची छाननी सार्वजनिक बांधकाम विभागाने केली असून रुपये **१०३१.००** लक्ष इतक्या अंदाजित किंमतीस मान्यता दिली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व नियोजन विभागाने सदरहू कामाचा आराखडा व अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून सहमती दर्शविली आहे.

अ) स्मारक उभारताना त्याच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असून देखभाल करणारी संस्था जर अशासकीय असेल तर संस्थेशी करारपत्र करुन घेणे तसेच अशी संस्था भविष्यात देखभाल करण्यास असमर्थ ठरल्यास प्रथमत: देखभाल करण्यासाठी अन्य संस्था निश्चित करणे व त्यानंतरच पूर्वीच्या संस्थेस जबाबदारीतून मुक्त करणे याबाबतचे नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांनी दक्षता घ्यावी.

ब) स्मारकाचे बांधकाम नियोजित वेळेतच पूर्ण होईल, याबाबत जिल्हाधिकारी,सांगली यांनी खबरदारी घ्यावी व स्मारकाच्या बांधकामाबाबतची सद्यस्थिती शासनास वेळोवळी अवगत करावी. तसेच स्मारकाची भविष्यात दुरावस्था होणार नाही याची दक्षता घ्यावी.

क) स्मारकास देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या मर्यादेत काम पुर्ण करण्याची जिल्हाधिकारी, सांगली यांनी दक्षता घ्यावी.

ड) प्रशासकीय मान्यता रक्कमेचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्यता दिलेल्या व सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील बाबीवर खर्च करण्यात येईल याबाबत जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

इ) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम हाती घेण्यात यावे व विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घेण्यात यावे.

ई) प्रत्यक्ष काम करते वेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही/२०१३/प्र.क्र.१७७/तां.क-१, दिनांक १०/१/२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

उ) सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीडीजी२०१७/प्र.क्र. ६०/इमारती-२, दिनांक ७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

ऊ) सदर कामाच्या अंदाजपत्रकावर मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे व जिल्हाधिकारी यांच्या सक्षम अधिका-यांचे साक्षांकन करुन घ्यावे.

२. या कामावर होणारा खर्च मागणी क्रमांक-ए-४, मुख्य लेखाशिर्ष, २०५९ सार्वजनिक बांधकामे८०-सर्वसाधारण ८०० - राज्य योजना (००)(०२) राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यांचे बांधकामे (२०५९ ३१७७), ५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांच्या मौजे वाळवा, जि.सांगली येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या दुस-या टप्प्याच्या बांधकामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे यांनी तयार केलेल्या आराखडा व अंदाजपत्रकानुसार रु.१०३१.००/-(रु.दहा कोटी एकतीस लक्ष फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रक व आराखडयास वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग अनौ. संदर्भ क्र. ५२४ स/बां,दिनांक १७/२/२०१८ व नियोजन विभाग अनौ.संदर्भ क्र. १२५/१८/१४४३, दिनांक १३/६/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार वित्तीय अधिकार अधिनियम पुस्तिका १९७४ मधील भाग पहिला, उप विभाग तीन, अनुक्रमांक चार, परिच्छेद क्र.२७ (२) व १३४ नुसार तसेच नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक ससमा २०१०/प्र क्र. ४८ (भाग-१)/ का-१४६१, दिनांक ११/६/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०७१३१७४६२९२६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chhaya Kiran Wadte

Digitally signed by Chhaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f311bd8712a7b94b3b73d0e88ad01cf3a49c098bcd5f62e16e7135388baa523c, serialNumber=5bac345149360802f8cd3e4ab4ec174f2fec1bff420e81931e638ee6cdfcc12d, cn=Chhaya Kiran Wadte
Date: 2018.07.13 17:47:32 +05'30'

(छा. कि. वडते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. सचिव, (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई,
५. जिल्हाधिकारी, सांगली.
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
७. महालेखापाल -१/२ (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली
९. निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली.
१०. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम विभाग),सांगली.
११. कार्यासन अधिकारी, (कार्या.-१४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी (कार्या-२५), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (कार्यासन व्यय- ४/अर्थसंकल्प-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन अधिकारी (इमा-३),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई.
१५. अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव (व्यय), वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१७. निवडनस्ती (कार्यासन २९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Sheet1

Name of the Department : GENERAL ADMINISTRATION DEPTT.

Name of Work : Construction of Lt. Padmabhushan Krantiveer Dr. Nagnathanna Naikwadi Smarak Memorial Campus Development at Walwa Tal. Walwa Dist. Sangli

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Items		Norms (Unit Rate Rs. per Sqmt/Meter/LumpSum etc.)	Cost Rs.
(A)	ESSENTIAL ITEMS			
1	Building proper (Scope)			
	Jeevan Darshini - Balance Work		As per Detailed Estimate	1,722,840
	Auditorium - Balance Work		As per Detailed Estimate	970,765
	Sahakar Prashikshan Kendra		As per Detailed Estimate	10,564,487
	Toilet Block	64	25000 Per Sqmt.	1,600,000
	(c) Foundation in B.C.J Weak Soil			
	(d) Cost of Construction			14,924,082
2	Electrification			
	Jeevan Darshini - Balance Work		As per Detailed Estimate	321,991
	Auditorium - Balance Work		As per Detailed Estimate	2,431,533
	Sahakar Prashikshan Kendra		As per Detailed Estimate	2,290,935
	Toilet Block		5%	80,000
			Total	5,164,459
3	Water Supply and Sanitation		5% - of 1(d)	746,204
4	Miscellaneous Items			
	Furniture	2077	5000 Per Sqmt.	10,385,000
	Compound Wall		As per Detailed Estimate	7,423,524
	Paving & Footpath		As per Detailed Estimate	2,571,972
	Parking Area		As per Detailed Estimate	1,221,075
	Fire Fighting Arrangement		Lump Sum	2,200,000
	Street Lighting & General Lighting		Lump Sum	4,500,000
	Interior Work for Jeevan Darshini,Auditorium,Sahakar Prashikshan Kendra		Lump Sum	11,800,000
	Murals, Sculptures etc.		Lump Sum	6,000,000
	Accesories & Equipments		Lump Sum	2,500,000
	Sound Projector System		Lump Sum	1,000,000
	Watchman Cabin, Gates, Arches Name Plates etc.		Lump Sum	2,000,000
	Landscaping		Lump Sum	1,500,000
			Total	80,101,611
			Sub Total (A) = (1)+(2)+(3)+(4)	70,928,356
(B)	OPTIONAL ITEMS			
Sr.	Items			
[illegible]	Air Conditioning		Lump Sum	4,800,000
[illegible]	Lifts		Lump Sum	4,000,000
[illegible]	Green Building Concept		5% of 1(d)	746,204
[illegible]	Architectural Fees & Consultation Charges		5 % of (A)	3,546,318
[illegible]	[illegible]		Subtotal (B)	13,092,522
	[illegible] PROJECT (A) + (B)		(T)	84,018,878
	[illegible] ancies on (d)			898,963
	[illegible] lation on (T)			8,401,858
	[illegible] for GST on (T)			10,082,285
	[illegible] OF PROJECT			103,089,994
	Say Rs. Lakhs			1,031.00